कर्मचारीवर्ग खाते :
परिपत्रक क्र. २७ /१९९४

क्र. राप/आस्था/७२०-जीई/ ६५२०
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०० ००८. दिनांक :५. १२. ९४

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर / नाशिक / अमरावती.

विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ,
भांडार विभाग, कुर्ला, मुंबई/मुंबई/धुळे/जळगांव/नाशिक/पालघर/रायगड[पेण]/
रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/पुणे/अहमदनगर/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/
औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/अकोला/
अमरावती/भंडारा/बुलढाणा/चंद्रपूर/वर्धा/यवतमाळ.

विषय : आदिवासी क्षेत्रात काम करणा-या अधिकारी/कर्मचारी
यांना प्रोत्साहन भत्ता.
संदर्भ : कामगार करार दिनांक १. ४. ९२ ते ३१. ३. ९६
मागणी क्रमांक : २०.

---

उपरोक्त कामगार करारात ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने निर्देशित केलेल्या आदिवासी क्षेत्रात काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांना शासनाने निर्देशित केलेल्या दराने व नियमाप्रमाणे भत्ता देण्याचे मान्य केलेले आहे. त्यानुसार आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणा-या रा. प. अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्या-संबंधी खालील तत्वप्रणाली ठरविण्यात आली आहे.

१] आदिवासी उप योजना क्षेत्र म्हणून निर्धारीत केलेल्या राज्यातील ठाणे / रायगड / नाशिक / धुळे / जळगांव / अहमदनगर / पुणे / नांदेड / अमरावती / नागपूर / भंडारा / यवतमाळ / चंद्रपूर आणि गडचिरोली या १४ जिल्हयातील एकूण ६,९६२ गांवे व १३ शहरे असा एकूण ६,९७५ गांवात कार्यरत असलेल्या व तेथे मुख्यालय असलेल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांना शासनाने निर्धारीत केलेल्या दराने दिनांक १. ५. ९२ पासून प्रोत्साहन भत्ता लागू करण्यात यावा व तो डिसेंबर-१९९४ पूर्वी अदा करण्यात यावा.

२] आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक आस्था/१०९३/प्र. क्र.-२६१/का-१५, दिनांक २९. १२. १९९३ व शासन निर्णय क्रमांक आस्था/१०९३/प्र. क्र.-२६१/का-१५, दिनांक २८. ४. १९९४ नुसार प्रसारित केलेल्या शासन निर्णयाच्या प्रती ~~शासनाने निर्देशित केलेल्या गावांच्या यादीसह~~ सोबत माहितीसाठी व कार्यालयीन उपयोगासाठी पाठवित आहे. तरी शासन निर्णयाप्रमाणे कार्यरत असलेल्या व तेथे मुख्यालय असलेल्या रा. प. कर्मचारी व अधिका-यांना सदरचा प्रोत्साहन भत्ता देण्याविषयी कार्यवाही करावी. याबाबतीत आपणांस काही संदर्भाची आवश्यकता भासल्यास आपल्या कार्यक्षेत्रातील नजिकच्या तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी

...२